The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत एकनाथ महाराजांच्या भारुडांचा चिकित्सक अभ्यास

**सुमेधा अच्युतराव कुटे**
**संशोधक विद्यार्थी, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी**

**प्रस्तावना-**

संत एकनाथ महाराजांचा जन्म मराठवाड्यातील गोदावरी नदीकाठी वसलेल्या पैठण येथे 1533 मध्ये झाला. ज्यांनी विजयनगरून श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपुरात आणली त्या भानुदासाचे नात हे पंथु होत. एकनाथ महाराजांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण व आईचे नाव रुक्मिणी होते. संत एकनाथ महाराज लहान असताना त्यांचे आई-वडील वारले त्यामुळे त्यांचे पालनपोषण आजी सरस्वती व आजोबा चक्रपाणी यांनी केले. भक्तीची परंपरा असणाऱ्या घरात जन्म झाला असल्यामुळे सहाजिकच लहानपणापासून संत एकनाथांच्या मनावर परमेश्वराच्या भक्तीचे संस्कार झाले होते वयाच्या बाराव्या वर्षी नाथांनी देवगिरी येथील जनार्दन स्वामी कडे जाऊन त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. त्यानंतर त्यांनी ग्रहस्थआश्रम स्वीकारला.

पैठण जवळच असणाऱ्या वैजापूरच्या गिरीजाबाई नावाच्या मुलीशी विवाह केला. त्यांना हरी नावाचा मुलगा व गोदावरी व गंगा नावाच्या दोन मुली होत्या. प्रपंच आणि परमार्थ यांची कुशलतेने सांगड घातली संसारात राहून परमार्थ करता येतो हे त्यांनी दाखवून दिले. नाथांनी भारुड, गौळण ,अभंग ,पदे ,टीका ग्रंथ, चतु: श्लोकी भागवत ,एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, अभंग गाथा ही नाथांची महत्त्वपूर्ण ग्रंथसंपदा होय. रचना त्यांनी लोकभाषेतून केली म्हणून त्यांना समन्वयकार व लोकशिक्षक या उपाधीने ओळखले जाते. परतंत्र आणि अनाथ महाराष्ट्राला संत एकनाथांनी सनाथ केले. आपल्या वाणीने आणि लेखणीने ज्ञानेश्वर प्रणित भागवत धर्माचा संदेश त्यांनी समाजाच्या वेगवेगळ्या घरांमध्ये नेऊन पोहोचविला. लोक भाषेतील त्यांच्या अभंगवाणीने जातीपातीच्या सीमा ओलांडून उच्च आशा जीवन मूल्याचा प्रसार केला. त्यांनी साहित्यातून हिंदू धर्म भावना जागृत करण्याचे कार्य केले. महाराष्ट्रात "भागवत धर्माला आधार देऊन भागवत धर्माची ध्वज जाणे फडकवत ठेवली आशा महान पुरुष म्हणजे संत एकनाथ महाराज होय" असा नाथांचा गौरव न्यायमूर्ती रानडे यांनी केला आहे. नाथांनी जुन्या भागवत धर्मात पुनर्जीवन करून महाराष्ट्रात एक नवीन जागृती निर्माण केली.

"जनार्दनी एकनाथ खांब दिला भागवत" असा यथार्थ शब्दात बहिणाबाईंनी एकनाथांचे वर्णन केले आहे महाराष्ट्राचा समन्वयकार संत एकनाथ महाराजांनी इसवी सन १५९९ मध्ये इहलोकीचा निरोप घेतला नात्यांची भारुडे आजही सामान्यांच्या मुखात आहेत महाराजांची भारुडे आजही जनकल्याणार्थ उपयोगी पडतात.

**संत एकनाथ महाराजांच्या भारुडाचा चिकित्सक अभ्यास :**

अंधश्रद्धा अज्ञान ढोंगी प्रवृत्ती अंगारा धुपारा अशा बऱ्याच संकटांनी हे थैमान माजले होते. त्यासाठी नाथांनी भारुडाद्वारे समाजाचे प्रबोधन केले व नाथांची भारुडे आजही उपयोगी पडतात एकनाथ महाराज म्हणतात,

' विंचू चावला वृश्चिक चावला | काम क्रोध विंचू चावला | तम घाम अंगाशी आला || धृ ||
पंचप्राण व्याकुळ झाला | त्यांनी माझा प्राण चालीला | सर्वांगाचा दहा झाला ||१|| '

हे नाथांचे भारूड चांगले गुण धारण करून वाईट गुणांवर मात करायला शिकवते. काम क्रोध हे विकार किती भयंकर आहेत याची जाणीव करून देते. अंगारा धुपारा लावणाऱ्या अंधश्रद्धेवर प्रहार करते. नाथांनी त्या काळात लिहिलेले भारुड आपल्याला आजही मार्गदर्शक ठरते. आपल्यातील दुर्गुण शोधायला शिकवते सद्गुण स्वीकारायला लावते लावते.

' कर जोडूनी विनवितो तुम्हा | तुम्ही वासुदेव म्हणा | नको गुंतू विषयकामा तुम्ही आठवा मधुसूदना ||१|| हेचि माझी विनवणी जोडीतो कर दोन्ही || शरण एका जनार्दनी तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी || '

नाथांचा वासुदेव अगदी प्रेमळ मनाने भावनेने मानवी जीवनाचे श्रेष्ठत्व सांगतो. तू संतांची शिकवण समाजापुढे मांडण्याचे कार्य करतो. कारण जीवनाचे श्रेष्ठत्व साधण्यासाठी संतांशिवाय दुसरा मार्ग नाही संतांमुळे (गुरु) मनातील दुर्गुणाचा नाश होऊन सत्वगुण वाढत जाते.

' नमो आदिमाया भगवती | अनादी सिद्ध मूळ प्रवृत्ती | महालक्ष्मी त्रिजगती बये दार उघड | '

त्या काळातील समाज जीवन रूढी प्रथा परंपरा अंधश्रद्धा अशा अनेक विकाराने ग्रासले होते. त्यासाठी अदिशक्तींचा गोंधळ घालून नाथांनी प्रार्थना केली होती की , हे माते तुझ्या कृपेचे दार उघडलेच पाहिजे त्या काळातीलच नव्हे तर आजची ही गरज आहे असे म्हणतात की, निशुंभ रक्तबीज आधी राक्षसांना मारण्यासाठी दुर्गेने चंडिचा अवतार घेतला आणि नऊ दिवस या राक्षसांबरोबर युद्ध करून दशमीला तिने अंतिम विजय मिळवला. पण आज राक्षस नष्ट झाले असले तरी राक्षसी प्रवृत्ती अजूनही पाठीमागे शिल्लक आहे. आज प्रत्येक स्त्रीने आदिमाया भगवती होऊनच राक्षसी प्रवर्तिचा नाश केला पाहिजे हे शिकवण देणारे नाथांचे भारूड आजही समाज उपयोगी आहे.

'सत्वर पाव ग मला | भवानी आई रोडगा वाहीन तुला | सासरा माझा गावी गेला तिकडेच खपवली त्याला ||'

या भारुडातून स्त्रीच्या जीवनातील सासरवास व्यक्त झाला आहे. जीवनरुपी संसारात विविध पाषांणी आवळली गेलेली ही स्त्री जेव्हा तिला तिच्या स्वतःची जाणीव होते तेव्हा ती देवीला नवस करते आणि म्हणते हे 'भवानी आई रोडगा वाहीन तुला ' म्हणजे मला या संसारातून मोकळी कर माझी सासू ,सासरा, जाऊ खूपच जाच करते या दुःखमय जीवनातून मला मोकळी कर या दृष्ट ,अहंकारी ,अविवेकी माणसात मी अडकले गेले आहे. या सर्वांपासून मला मोकळे कर तुला सर्वस्वाचा रोडगा वाहीन या जीवन मुक्त हो पाहणाऱ्या स्त्रीच्या मनाची घालमेल रोडगा या भारुडातून व्यक्त झाली आहे आजही या भारुडातून स्त्रीचे दुःख व्यक्त होते.

" मी जी जागतो गाव निजला सारा | कोणी हुशार नाहीत घरा | अवघी निजले श्रमले संसारी | काही तरी पुढीलाची सोय धरा ||१||

या भारुडातील जागल्या सर्वांना विषयभोगाच्या प्रगाढ झोपेतून जागे होण्याचा संदेश देते. नाथ हे परमार्थ मार्गातील जागले आहेत. म्हणून अज्ञान धारकात झोपी गेलेल्या लोकांना सावध करून त्यांच्या आत्महिताच्या जपवणुकीसाठी ते आव्हान करतात. हा जागल्या सांगतो 'अज्ञानाची झोप येऊ देऊ नका ' ज्ञानाची मशाल हातात घेऊन समाजामध्ये सर्वत्र प्रकाशमय करा .असा संदेश देणारे एकनाथांचे भारूड समाजाच्या आजही उपयोगी पडते.

' मुका झालो वाचा गेली ||धृ || होतो पंडित महानज्ञानी | दशग्रंथ षडशास्त्र पुराण | चारी वेद मुखोद्गत वाणी | गर्वामध्ये झाली सर्व हानी ||१||

नाथांचा हा मुका महाज्ञानी पंडित असतो त्याला दशग्रंथ ,षडशास्त्र, पुराण ,वेद मुखोद्गत असतात. त्यामुळे त्याला अहंकार येतो तो हरिभक्तांची संतांचे स्तुती न करता निंदा करतो म्हणून नाथ महाराज म्हणतात लोकांची निंदा थट्टा केल्याने हा मुका झाला आहे. त्याला अज्ञान अहंकारामुळे सज्जन लोक दिसत नाहीत त्यामुळे वाचा असूनही तो मुका आहे असे नाथ महाराज सांगतात.

**समारोप :**

संत एकनाथ महाराजांच्या भारुडाचा अभ्यास केल्यानंतर असे समजते की, आज विज्ञान युगात नाथांचे भारुड समाज उपयोगी आहेत व आजही नाथांचे भारूड सर्वसामान्य लोकांच्या मुखात आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1) नसिराबादकर ल. रा. : 'प्राचीन मराठी वाङ्ममयाचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2) सरदार गं. बा : 'संत वाडमयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्ममय गृह, मुंबई.
3) देशमुख उषा : 'संत काव्य संचित', माया प्रकाशन, नागपूर.
4) इनामदार हे.वि. (संपा.) : 'संत एकनाथ दर्शन' , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
5) पेंडसे शं.दा. : 'महाराष्ट्राचा भागवत धर्म', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.